सकाळ

# विद्यार्थ्यांना मिळणार आता घरबसल्या प्रवेश

## अभियांत्रिकी प्रवेशासाठी तालुक्याच्या ठिकाणी केंद्र

**संतोष शाळिग्राम** :
सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. १० :** अभियांत्रिकीसह व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यायचा म्हटले, की धावाधाव आलीच. पण, या वर्षी विद्यार्थ्यांना घरबसल्या प्रवेश घेता येईल आणि एकाच ठिकाणी अर्ज स्वीकृती, कागदपत्रांची पडताळणीदेखील करता येईल. त्यासाठी अर्ज स्वीकृती केंद्र आणि प्रवेश निश्चिती केंद्र हे थेट तालुक्याच्या ठिकाणी सुरू करण्यात येणार आहेत.

व्यावसायिक अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया ही तंत्र शिक्षण संचालनालय आणि प्रवेश परीक्षा कक्ष करीत असे. परंतु, या वर्षीपासून संचालनालय या प्रक्रियेत नसेल. संपूर्ण प्रक्रिया ही कक्षाच्या आयुक्तांच्या नियंत्रणाखाली होणार आहे. ही प्रक्रिया राबविण्यासाठी खासगी यंत्रणेला कंत्राट दिले जाणार आहे.

राज्यभरात विद्यार्थ्यांसाठी दोन हजार सुविधा केंद्रे सुरू करण्याची तयारी कक्षाने केली आहे. महाविद्यालयांबरोबरच जिल्हाधिकारी वा तहसील कार्यालयातही ही केंद्रे असतील.

प्रवेश प्रक्रियेत अर्ज भरणे आणि कागदपत्रांची पडताळणी करून प्रवेश निश्चित करणे, हे महत्त्वाचे टप्पे आहेत. यापूर्वी विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चितीसाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये, शासकीय तंत्रनिकेतने येथे जावे लागत होते. ही केंद्रे जिल्ह्याच्या ठिकाणी असत. त्यामुळे विद्यार्थ्यांना धावाधाव करीत तेथे जाऊन प्रवेश निश्चित करावा लागत होता. परंतु, या वर्षी तालुक्याच्या ठिकाणी ही प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

### ऑनलाईन शुल्क भरता येणार

कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर विद्यार्थ्याला प्रवेशासाठी महाविद्यालय दिले (अॅलॉटमेंट) जाते. त्याचे स्वीकृतपत्र विद्यार्थ्याला ऑनलाइन मिळेल. त्यानंतर प्रवेश निश्चित केलेल्या महाविद्यालयात त्याला शुल्कदेखील ऑनलाइन भरून घरबसल्या प्रवेश मिळविता येईल.

पुढारी

# उन्हाळी परीक्षेतील कॉपी प्रकरण 'प्रमाद समिती'कडे

## शुक्रवारच्या बैठकीत होणार कारवाईबाबत निर्णय

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षेत कॉपीबहाद्दरांचा सुळसुळाट झाल्याचे समोर आले आहे. २६ मार्चपासून सुरू झालेल्या परीक्षेतील कॉपी बहाद्दरांची संख्या शंभरावर पोहोचली आहे. भरारी पथक समितीमार्फत परीक्षा सुरू झाल्यानंतरच्या १५ दिवसांत कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांबाबतचा अहवाल तयार करण्यात आला आहे. १२ एप्रिल रोजी होणाऱ्या परीक्षा प्रमाद समितीच्या बैठकीत कॉपी बहाद्दरांवर कारवाई करण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

२६ मार्चपासून शिवाजी विद्यापीठाच्या अखत्यारीत येणाऱ्या कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यांतील महाविद्यालये व विद्यापीठातील अधिविभागांच्या परीक्षांना सुरुवात झाली आहे. परीक्षाकाळात केंद्रांवर होणाऱ्या अनुचित प्रकारांवर नजर ठेवण्याबरोबरच कॉपीप्रकरणी कारवाई करण्यासाठी कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्ह्यांसाठी सहा भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. गेल्या १५ दिवसांमध्ये परीक्षा केंद्रांवर अचानक भेट देत भरारी पथकाच्या सदस्यांनी कॉपी



करणाऱ्या विद्यार्थ्यांना पकडले असून त्यांच्या नावाची यादी शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा प्रमाद समितीकडे पाठवली आहेत.

## एसटीच्या धडकेत महिला ठार

**आष्टा :** येथील बसस्थानकात बुधवारी सकाळी एस.टी. बसचे चाक पायावरून गेल्यामुळे श्रीमती लक्ष्मी नामदेव मोरे (वय ८०, रा. गोटखिंडी, ता. वाळवा) या गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांना उपचारासाठी कोल्हापूर येथे घेऊन जात असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. सांगलीकडून इस्लामपूरकडे निघालेली बस (एमएच ४० एन ९४७०) बुधवारी सकाळी आष्टा बसस्थानकात येताना हा अपघात झाला. याबाबत आष्टा पोलिसांत नोंद झाली आहे.

Kolhapur Edition
11 Apr, 2019 Page No. 5
Powered by : erelego.com